# कोरोना व्हायरस (COVID -19) बद्दल प्रसासरीत होणा-या खोट्या बातम्या (Fake News) / माहिती संदर्भात अॅडव्हायजरी.

सदर अॅडव्हायजरी ही महाराष्ट्र राज्यातील नागिरकांना कोरोना व्हायरस संदर्भात प्रसारित होणाऱ्या खोट्या बातम्या व पसरणाऱ्या अफवांपासून सावध राहण्यासाठी जन हिथार्थ महाराष्ट्र सायबर तर्फे जारी करण्यात येत आहे .

विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर.
३२ वा मजला ,जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड ,मुंबई -४००००५

Scanned by CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर.

३२ वा मजला ,जागतिक व्यापार केंद्र,

कफ परेड ,मुंबई -४००००५

सध्या जगात सगळीकडे पसरणारा व धुमाकूळ घालणारा कोरोना व्हायरस (COVID -19) हा विषाणू आपल्या भारतात व महाराष्ट्र राज्यात जलदगतीने पसरत आहे. कोरोना व्हायरस (COVID -19) विषयी खोटया बातम्या आणि अफवा पसरविण्यासाठी विविध समाजमाध्यमांचा उदा : फेसबुक,ट्विटर ,इंस्टाग्राम ,युट्युब ,टिकटॉक व अन्य प्लॅटफार्मचा मोठया प्रमाणात वापर केला जात आहे .

महाराष्ट्रातील COVID-19 ची सद्यस्थिती पाहता महाराष्ट्र सायबर हे कार्यालय, COVID-19 विषयी खोटया बातम्या आणि अफवा पसरविणाऱ्यां विरोधात ॲडव्हायजरी जारी करत आहे.

महाराष्ट्र सायबरच्या असे निदर्शनास आले आहे की, समाजातील काही विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीचे घटक समाजमाध्यमाद्वारे मुद्दाम खोटया बातम्या व अफवा पसरवून समाजात व नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहे व समाजात शांतता भंग करुन अराजकता पसरविण्याचे प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्र सायबर या ॲडव्हायजरीद्वारे सर्व नागरिकांना अशा प्रकारच्या कृत्यामध्ये सहभागी न होता त्यापासून दूर राहण्याचे आवाहान करत आहे,जेणेकरून समाजात भीती व दहशतीचे वातावरण पसरण्यास आणि गंभीर समस्या निर्माण होण्यापासून प्रतिबंध होईल.

तसेच सर्व टिव्ही चॅनेल्स, सर्व वृत्तपत्रे यांना महाराष्ट्र सायबर विनंती करते की, कोरोना व्हायरस संदर्भातील कोणतीही बातमी खातरजमा करुनच प्रसारीत करावी.

नागरीकांनी अफवा पसरविणाऱ्या लोकांच्या तक्रारी जवळच्या स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये किंवा www.cybercrime.gov.in यावर नोंद कराव्यात.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांची दिनांक 14/03/2020 रोजीची “The Maharashtra COVID-19 Regulations 2020” ही अधिसुचना जाहीर केलेली आहे. त्यानुसार कोणतीही व्यक्ती/संस्था कोरोना व्हायरस COVID-19 बाबत खोटया बातम्या अगर अफवा पसरवताना आढळल्यास त्यांना “THE EPIDEMIC DISEASES ACT, 1897” च्या कलम 03 अन्वये नमुद केल्याप्रमाणे जबाबदार धरले जाईल.

सदरचे कृत्य भारतीय दंड संहिता, 1860 च्या कलम 188 अन्वये दंडनीय अपराध असल्याचे समजले जाईल.

या अधिसुचनेचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्याची सुचना महाराष्ट्र सायबर कडुन करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र सायबर या अधिसुचनेद्वारे सर्व नागरिकांना विनंती करीत आहे की, कोरोना व्हायरस (COVID -19) संदर्भातील फक्त अधिकृत माहिती व बातम्यांवरच विश्वास ठेवावा. अशी अधिकृत माहिती खालील संकेत स्थळांवर उपलब्ध आहे .

- आरोग्य मंत्रालय, भारत सरकार-

भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाची खालील अधिकृत वेबसाइट कोरोना व्हायरस COVID-19 या विषाणू विषयी माहिती, प्रवासी सल्लामसलत, सुरक्षितता उपाय, मार्गदर्शक तत्त्वे आणि इतर उपयुक्त माहितीशी संबंधित असलेल्या कार्ये आणि त्याबद्दल सविस्तर माहिती प्रदान करते.

https://www.mohfw.gov.in/

- जागतिक आरोग्य संघटना - (WHO)

जागतिक आरोग्य संघटनेची खालील अधिकृत वेबसाइट कोरोना व्हायरस COVID-19 या विषाणू विषयी सर्व माहिती उपलब्ध करीत आहे.

https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019

सर्व नागरिकांना आव्हान आहे की, त्यांनी सदर संकेतस्थळांना (Website) भेट देऊन त्यावरील कोरोना व्हायरस बाबत नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे व खबरदारी घेण्याचे उपाय वाचून सदर उपाय अमलात आणावेत

Scanned by CamScanner